**रमाई आवास योजना (Ramai Awaas Yojana) (सन २०१६-१७ पासून जि.ग्रा.वि.यंत्रणेमार्फत सुरू आहे)**

| अ. क्र. | घरकुल योजनेचे नांव | योजना कोणत्या विभागामार्फत आहे | योजनेचा उद्देश | अटी व शर्ती | घरकुलाचे क्षेत्रफळ | योजनेतील एकूण टप्प्यानुसार हप्त्यांची संख्या, हप्ता रक्कम व एम आर ई जी एस मजुरी रक्कम | | | अनुदान व फायदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | हप्ता क्रमांक | रक्कम रूपये | टप्पा | |
| १ | रमाई आवास योजना | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | कच्चेघर व बेघर अनुसुचित जाती मधील कुटुंबांना निवारा उपलब्ध करुन देणे | १.प्रधानमंत्री आवास योजनेच्या यादीत नांव नसलेल्या परंतु ग्रामसभेच्या ठरावासह मंजुर केलेल्या कच्चेघर व बेघर अनुसुचित जाती मधील कुटुंबांना यादीनुसार निवारा उपलब्ध करुन देणे | २५ मीटर (२६९ चौरस फुट) | १ | ३५०००/- | घरकुल मंजुर झाल्यावर पहिला हप्ता | सदर योजनेतंर्गत राज्य शासनाकडून १००% अनुदान प्राप्त होते. राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार घरकुलांची किंमत रक्कम रु. १,२०,०००/- निश्चित करण्यात आलेली आहे. एकूण घरकुलाची किंमत रक्कम रुपये :-१,२०,०००/- बँक खात्यामध्ये राज्य शासनाकडून थेट ऑनलाईन जमा करण्यात येते. |
| | | | | २.लाभार्थीकडे अनुसुचित जातीचा दाखला व १ लाखापर्यंत उत्पन्नाचा दाखला असावा | | २ | ५००००/- | विट बांधकाम छतपातळीपर्यंत पुर्ण झाल्यानंतर | महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत सदर लाभार्थींना बांधकामाच्या टप्प्यानिहाय ९० दिवसांची मजुरी रक्कम प्रतिदिन २०१/- प्रमाणे दिली जाते. सदर मजुरी लाभार्थीच्या बँक खात्यामध्ये राज्य शासनाकडून थेट ऑनलाईन जमा करण्यात येते. (पहिले मस्टर-२८ दिवसांचे जोतापुर्ण झाल्यानंतर रक्कम रूपये -५६२८/-, दुसरे मस्टर - २४ दिवसांचे छज्जा पातळी पुर्ण झाल्यानंतर रक्कम रूपये ४८२४/-,तिसरे मस्टर - १० दिवसांचे छतपातळी पुर्ण झाल्यानंतर रक्कम रूपये २०१०/- व चौथे मस्टर -२८ दिवसांचे शौचालय पुर्ण झाल्यानंतर रक्कम रूपये ५६२८/- असे एकूण रक्कम रूपये १८०९०/- अकुशल मजुरी दिली जाते) |
| | | | | ३.यापूर्वी कोणत्याही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा. | | ३ | ३५०००/- | शौचालयासह छतावर पत्रे टाकुन पुर्ण घरकुल बांधकाम झाल्यानंतर अंतिम हप्ता | |
| | | | | ४.लाभार्थीचे राहते घर कच्चे असावे | | एकूण | १२००००/- | | |
| | | | | ५. घरकुलामध्ये शौचालय बांधकाम करणे आवश्यक आहे. | | एम आर ई जी एस मजुरी - चार टप्प्यात | १८०९०/- | | |
| | | | | ६. घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्याकडे स्वतःची जागा असणे आवश्यक | | एकूण लाभ | १३८०९०/- | | |